# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**उच्च माध्यमिक विद्यालय / कनिष्ठ महाविद्यालय शिक्षकांना वेतन श्रेणीत सुधारणा करण्याबाबत**

**(१) ३५७३४ (२१-०१-२०१६). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उच्च माध्यमिक विद्यालय / कनिष्ठ महाविद्यालय शिक्षकांकडे दोन विषयांचा कार्यभार असल्यास पदव्युत्तर पदवी धारक प्रशिक्षीत शिक्षकाला दुसरा विषय पदवी स्तरावर असल्यास याबाबत दिनांक १ डिसेंबर, २००५ रोजीच्या शासननिर्णयान्वये अशा शिक्षक सेवकांना नियुक्तीच्या दिनांकानंतर रुपये ९०००/- मानधनावर तसेच तीन ते चार वर्षात दुस-या विषयात पदव्युत्तर पदवी धारण करण्याच्या अटीवर तीन वर्षे शिक्षण सेवक व त्यानंतर एक वर्ष सहा महिने शिक्षक पुर्णकालीन वेतनश्रेणीत मान्यता दिली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तीन ते चार वर्षे सदर शिक्षक दोन्ही विषय शिकविण्यास पात्र समजणे आवश्यक असताना देखील दिनांक १ डिसेंबर, २००५ च्या शासन निर्णयापुर्वीच्या अशा शिक्षकांना पात्र समजण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पात्र समजत असल्यास (दिनांक १ डिसेंबर, २००५ पुर्वीच्या) नियुक्तीपासून रूपये ७२२५-११०५० ही वेतनश्रेणी दिली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) नसल्यास, याबाबत शासनाची काय भूमिका आहे ?

**श्री. विनोद तावडे (१४-११-२०१७) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) सदर सवलत ही शासन निर्णयाच्या दिनांकापासून लागु असल्याने त्यापुर्वीच्या शिक्षकांना पात्र समजण्यात येत नाही.

(४) ज्या उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षकाला पदव्युत्तर विषयातील १७/१८ घडयाळी तासाच्या ¾ कार्यभार उपलब्ध होत नाही, त्या शिक्षकाचा पदव्युत्तर विषयाचा ५० टक्के व पदवी पातळीवरील एका विषयाचा ५० टक्के कार्यभार विचारात घेऊन त्या शिक्षकाला पूर्णवेळ मान्यता द्यावी व त्याने तीन ते चार वर्षात दुसऱ्या विषयातील पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण करावी, अशी अट दिनांक १.१२.२००५ च्या शासन निर्णयात आहे. ही अट पूर्ण करणाऱ्या शिक्षकालाच सदरची सवलत देण्यात आली आहे.

---

## राज्यातील खाजगी विनाअनुदानित शाळांना सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षासाठी १५ टक्के फी वाढ करण्यास मा. उच्च न्यायालयाने दिलेली मान्यता

**(२) ४२०१० (१६-०५-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी विनाअनुदानित शाळांना सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षासाठी १५ टक्के फी वाढ करण्यास मा.उच्च न्यायालयाने दिनांक २३ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास मान्यता दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संबंधित महाराष्ट्र शिक्षण संस्था (शुल्क नियंत्रण) २०११ अधिनियम संमत होवून चार वर्षे, कालावधी होवूनही अद्याप शासनाने यातील तरतुदींची पूर्तता केली नाही, हे ही खरे आहे काय, असल्यास उक्त तरतुदींची पूर्तता करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहे,

(३) असल्यास, उक्त अधिनियमातील तरतुदींची त्वरीत अंमलबजावणी करण्याकरीता अद्यापपर्यंत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-११-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.

शाळा व्यवस्थापनास, आवश्यक असल्यास सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरीता, आधीच्या शैक्षणिक वर्षाची फी अधिक कमाल १५ टक्के रक्कम इतकी फी घेता येईल असे मा. उच्च न्यायालयाने अंतरीम आदेश दिले आहेत.

(२) व (३) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ राज्यात दिनांक १.१२.२०१४ पासून लागू झाला आहे. तसेच याअनुषंगाने महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) नियम, २०१६ लागू झाला असून विभागीय शुल्क नियामक समित्या शासन अधिसूचना दि. १.४.२०१६ अन्वये गठीत करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई (जि.पालघर) तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमधील मोठ्या प्रमाणात रिक्त असलेली पदे

**(३) ४८३४५ (१२-०५-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्यातील जिल्हा परिषदांच्या शाळांची दयनीय स्थिती तसेच वार्षिक परिक्षा तोंडावर आल्या तरी एकूण विद्यार्थी पटसंख्येनुसार गरजेच्या तुलनेत १२५ शिक्षक व १९ मुख्याध्यापकांची पदे रिक्त असल्याने त्यांच्या जागेवर प्रभारींची नेमणुक करुन कामे पुर्ण करण्याचे आदेश देऊन शाळांचा कारभार सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रभारी कामांमुळे शिक्षकांवर स्वत:चे काम सांभाळून अन्य शिक्षक व मुख्याध्यापकांची कामे करावी लागत असल्याने शिक्षकांना अतिरिक्त कामाचा व्याप व मानसिक ताण पडून शिकविण्याच्या मुळ जबाबदारीकडे दुर्लक्ष होऊन शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वसई तालुक्यात गत ६ वर्षापासून शिक्षण विभागासारख्या महत्वाच्या विभागावर स्वतंत्रपणे विभागप्रमुख म्हणजे स्वतंत्र गट शिक्षणाधिकारी हे पद भरलेले नसून त्यांचा पदभार प्रभारी म्हणून विस्तार अधिकाऱ्यांकडे दिला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, विद्यार्थ्यांच्या हितासाठी रिक्त असलेली पदे भरण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-११-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

वसई तालुक्यातील (जि.पालघर) जिल्हा परिषदांच्या शाळेमध्ये विद्यार्थी पट संख्येनुसार २६ शिक्षक व १९ मुख्याध्यापकांची पदे रिक्त आहेत.
(२) हे खरे नाही
(३) होय, हे खरे आहे
(४) व (५) रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर चालू आहे.

---

**भिवंडी (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४) ५१७५६ (०७-०५-२०१६). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाअंतर्गत एकूण सात भाषिक शाळा सुरु असून त्यापैकी मराठी माध्यमाच्या ३२ प्राथमिक शाळा सुरु आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इतर भाषिक शाळांमध्ये शिक्षकांची भरती झालेली नसून मराठी शाळांमध्ये शिक्षकांची ३६ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भिवंडी (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-१०-२०१७) :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे.
(३) व (४) प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडून शिफारस करण्यात आलेल्या केंद्रिय भरतीपूर्व निवड परीक्षा- २०१० मधील पात्र ८ उमेदवारांना दि.२४.६.२०१६ रोजी नियुक्ती देण्यात आलेली आहे. रिक्त पदे अभियोग्यता चाचणीतील गुणांच्या आधारे “पवित्र” या संगणकीय प्रणालीद्वारे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत कंत्राटी शिक्षक भरतीत उमेदवारांच्या नोकरीची वयोमर्यादा कमी करण्याकरिता चार लाखांची लाच मागितल्याबाबत**

**(५) ५२४२५ (२५-०४-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात एका प्राथमिक शाळेत कंत्राटी शिक्षक भरतीत उमेदवारांच्या नोकरीची वयोमर्यादा कमी करण्याकरिता चार लाखांची लाच मागितल्याची घटना नुकतीच निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास,चौकशीनुसार दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) या प्रकरणात केलेल्या चौकशीत सन २०१५-१६ मध्ये कोल्हापूर जिल्हा परिषद अंतर्गत उच्च माध्यमिक विभागातील विना अनुदानित कंत्राटी शिक्षकांची भरती, जिल्हा निवड समितीमार्फत करण्यात आली होती. सदर भरतीमध्ये मराठी-इतिहास या विषयासाठी अर्ज केलेले श्री.कुंडलिक महादेव जाधव, जि.कोल्हापूर यांचे जन्म तारखेमध्ये असलेली तफावत जिल्हा निवड समितीच्या बैठकीत निर्णय घेवून दूर करण्यात आली.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दादर (जि.मुंबई) येथील शारदाश्रम शाळेच्या फि वाढीबाबत**

**(६) ५५७४४ (२२-०८-२०१६). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर (जि.मुंबई) येथील शारदाश्रम शाळा व्यवस्थापनाने भरमसाठ फी वाढ केल्यामुळे तसेच इंग्रजी पहिलीला प्रवेश देतांना दुप्पट प्रवेश शुल्क भरण्याची तयारी असलेल्या विद्यार्थ्यांनाच प्रवेश दिल्याने संतप्त झालेल्या शेकडो पालकांनी शाळेसमोर माहे एप्रिल, २०१६ च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्या दरम्यान आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र शैक्षणिक संस्थांच्या शुल्क निश्चितीची नियमावली शासनाने गेल्या वर्षी जाहीर करुनही खाजगी शाळा भरमसाठ फी वाढ करुन पालकांना लुबाडीत असल्याचे प्रकार सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शाळांच्या वाढणाऱ्या फी विरोधात वेळोवेळी शिक्षण विभागाकडे तक्रार करुनही त्यांची अंमलबजावणी केली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील शाळा संस्थेकडून फी वाढवून पालकांची होणारी लुट थांबविण्यासाठी कायदा करुन धोरण ठरवून त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-११-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) खाजगी शाळांमध्ये फी वाढ करण्यात येते, हे खरे आहे.
(३) व (४) खाजगी शाळांच्या फी वाढी संदर्भात होत असलेल्या तक्रारी/आरोपाच्या अनुषंगाने महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ च्या सुधारणा संदर्भात शासनास शिफारशी करण्यासाठी मा.श्री.व्हि.जी.पळशीकर (सेवानिवृत्त न्यायाधिश) यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डोंबिवली (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील चंद्रकांत पाटकर शाळेमध्ये दरवर्षी विद्यार्थ्यांकडून वाढीव फी वसूल केली जात असल्याबाबत**

**(७) ५९६८१ (२२-०८-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोंबिवली (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील चंद्रकांत पाटकर शाळेमध्ये दरवर्षी विद्यार्थ्यांकडून १५ टक्के वाढीव फ़ी तसेच फ़ी वसूलीकरिता विद्यार्थी व पालकांवर जबरदस्ती केली जात असल्याचे निदर्शनास आल्याने विद्यार्थी व पालकांनी माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान शिक्षण विभागाकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागाने सदर शाळेची मान्यता रद्द करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदर शाळेवर कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबनाची करणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-११-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) यासंदर्भात शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या स्तरावरुन संबंधितांचा खुलासा घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येत होती. तथापि व्यवस्थापनाने मा.उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका क्र. ११०७५/२०१६ दाखल केली आहे. सद्यस्थितीत प्रकरण हे न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बालवाडी शिक्षिकांच्या मागण्याबाबत केलेले रस्ता रोको आंदोलन**

**(८) ६६८७० (१०-०१-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बालवाडी शिक्षिका सेविकांना शासनाकडून वेतन मिळावे, बालवाडी विद्यार्थ्यांना पोषण आहार मिळावा व अन्य मागण्याकरिता राज्य पूर्व प्राथमिक शिक्षिका व सेविका महासंघाच्यावतीने दिनांक १३ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास कोल्हापूर येथील राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ वर रस्ता रोको आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी अधिक चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, आंदोलकांच्या प्रमुख मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे सदर मागण्यांच्या पुर्ततेसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (१३-११-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) पूर्व प्राथमिक शैक्षणिक धोरणविषयक अधिनियम तयार करण्याचे शासन स्तरावर विचाराधीन आहे.

---

**नवी मुंबई मधील घणसोलीतील न्यु बॉम्बे सिटी स्कुलमधील विद्यार्थ्यींनीला वर्गाबाहेर बसवून पेपर लिहीण्यास भाग पाडल्याबाबत**

**(९) ७१४८५ (२७-०१-२०१७). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई मधील घणसोलीतील न्यु बॉम्बे सिटी स्कुलमधील इयत्ता १ ली ते १० वी च्या १०० विद्यार्थ्यींनी फी न भरल्याने व्यवस्थापनाने शिक्षा म्हणून सहामाही परिक्षेचा पेपर ४५ मिनिटे उशिरा देऊन वर्गाबाहेर बसवून लिहीण्यास सांगितले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यास गेलेल्या पालकांची शाळा व्यवस्थापनेकडून दखल घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उपरोक्त शाळा व्यवस्थापनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०३-११-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) फी न भरल्यामुळे कोणत्याही विद्यार्थ्यास परिक्षेपासून वंचित ठेवलेले नाही, असा शाळेचा खुलासा प्राप्त आहे. तसेच याबाबत पालकांची तक्रार प्राप्त झालेली नसल्याने कार्यवाही करण्याचा प्रश्न येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्य बास्केट बॉल स्पर्धेत अमरावती संघाने जिल्हयाबाहेरील खेळाडूंना खेळविल्याबाबत

**(१०) ७५७३९ (२०-०४-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील फादर ॲग्नेल कोर्टवर माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान झालेल्या राज्य बास्केट बॉल स्पर्धेत अमरावती संघाने जिल्हयाबाहेरील खेळाडूंना खेळवल्याची तक्रार नांदेडच्या संघाने करुन आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील बास्केटबॉल खेळाडूंची नोंदणी न केल्याने उक्त घटना घडली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यानुसार दोषी आढळणा-या खेळाडूंवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१०-११-२०१७) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) नांदेड संघाने तक्रार नोंदविलेल्या खेळाडूंना, पुणे जिल्हा बास्केटबॉल संघटनेने अमरावती संघाकडून खेळण्यास ना हरकत प्रमाणपत्र देऊन, संघटनेच्या खेळाडू ट्रान्स्फर नियमानुसार खेळाडूंना सहभागी होण्यास परवानगी दिली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ठाणे जिल्हयातील क्रीडाक्षेत्राच्या उदासीन धोरणाबाबत

**(११) ७७७५५ (२०-०४-२०१७). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील दरवर्षी क्रिडा क्षेत्रातील भरीव कामगिरीबाबत देण्यात येणाऱ्या क्रीडा पुरस्कारासाठी केवळ ३ क्रीडापटूंनीच अर्ज सादर केल्याचे दिनांक ७ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त पुरस्कारासाठी असलेल्या अटी किंवा क्रीडाक्षेत्राचे उदासीन धोरण याबाबत कारणीभूत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१०-११-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.

क्रीडा पुरस्काराकरीता पात्र गुणवंत खेळाडू विहीत मुदतीत प्राप्त न झाल्याने, वाढवून दिलेल्या अर्जाच्या दि.२०.०१.२०१७ पर्यतच्या मुदतीत एकूण ११ अर्ज प्राप्त झाले आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य परिक्षा परिषद आणि टंकलेखन संस्था यांच्या वादात राज्यातील**
**३६५ विद्यार्थी संगणक टंकलेखन परिक्षेपासून वंचित राहिल्याबाबत**

**(१२) ७७७७८ (२०-०४-२०१७). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिक्षा परिषद आणि टंकलेखन संस्था यांच्या वादात राज्यातील ३६५ विद्यार्थी संगणक टंकलेखन परिक्षेपासून वंचित राहिल्याचे दिनांक २७ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संस्था चालकांची टंकलेखन परिक्षा जिल्हा स्तरावर घ्यावी अशी मागणी असतानाही परिक्षा विभागीय स्तरावर घेण्याचा निर्णय घेतल्याने संस्थाचालकांनी उक्त परिक्षेवर बहिष्कार टाकल्याने राज्यातील केवळ ९० विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, उपरोक्त वंचित ३६५ विद्यार्थ्यांचे परीक्षेसाठी भरलेले शुल्क वाया जाणार असून पुन्हा परीक्षा देण्यासाठी त्यांना अर्ज आणि शुल्क भरावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (३०-१०-२०१७) :** (१), (२) व (३) अंशतः खरे आहे.

(४) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार ऑनलाईन परीक्षा घेतली आहे. तथापि, विद्यार्थी परीक्षेस अनुपस्थित राहिले. सदर अनुपस्थित विद्यार्थ्यांना पुढील परीक्षेत जानेवारी/फेब्रुवारी २०१७ मध्ये झालेल्या परीक्षेसाठी पुनर्परिक्षार्थी म्हणून आवेदनपत्र भरण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आली होती. या परिक्षेसाठी प्रत्येक जिल्हयात परीक्षा केंद्र उपलब्ध असल्याने विद्यार्थ्यांचे कोणतेही नुकसान झालेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्हा क्रीडा अधिकारी, रत्नागिरी यांच्या गैरकारभाराबाबत**

**(१३) ७८९३५ (२०-०४-२०१७). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा नियोजन समिती, रत्नागिरी मार्फत जिल्ह्यातील शाळांच्या क्रीडांगणासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला असतानाही केवळ जिल्हा क्रीडा अधिकारी, रत्नागिरी यांच्या

अनास्थेमुळे जिल्ह्यातील शाळा क्रीडांगणापासून वंचित राहिली असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कर्तव्यात कसूर करणाऱ्या जिल्हा क्रीडा अधिकारी, रत्नागिरी यांच्यावर तसेच जिल्ह्यातील शाळांसाठी मंजूर करण्यात आलेली क्रीडांगणे तातडीने उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०२-११-२०१७) :** (१) व (२) नाही. सदर प्रकरणी कोणतीही तक्रार शासनास अद्याप प्राप्त झाली नाही. तथापि, सन २०१६-१७ च्या मंजूर अनुदानातून क्रीडांगण विकास अनुदान योजनेअंतर्गत रु.३६.०० लाखाचा निधी ९ संस्थांना वाटण्यात आला आहे. उर्वरित रु.१४.०० लक्ष इतका निधी सन २०१५-१६ च्या दायित्वांसाठी वापरण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महसूल विभागवार सैनिकी शाळा उभारण्यात येण्याची मागणी**

**(१४) ७९७५६ (२०-०४-२०१७). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महसूल विभागवार सैनिकी शाळा उभारण्यात येण्याची मागणी जिल्हा सैनिक बोर्डाच्या पदाधिकारी मंडळांनी संबंधित जिल्हा सैनिक कल्याण बोर्डामार्फत मा.मंत्री (शालेय शिक्षण), मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण), प्रधान सचिव (शालेय शिक्षण), जिल्हा सैनिक बोर्ड यांच्याकडे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान जिल्हा समाज कल्याण प्रशासन, शालेय शिक्षण वा जिल्हा शिक्षण तसेच त्यांच्या अधीनस्त असलेल्या जिल्हा सैनिकी शिक्षण उपसंचालनालय (बृहन्मुंबई, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, पुणे, नागपूर, लातूर, कोल्हापूर) यांच्याकडून या संदर्भातील एकूण प्राप्त झालेले प्रस्ताव व त्यापैकी किती प्रस्तावास तत्वतः मंजुरी प्रत्यार्पित करण्यात आली आहे,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०३-११-२०१७) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मेंढ (ता.पाटण, जि.सातारा) येथील ज्योतीर्लिंग शिक्षण संस्थेतील गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत**

**(१५) ८३१३९ (२०-०४-२०१७). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेंढ (ता.पाटण, जि.सातारा) येथील ज्योतिर्लिंग शिक्षण संस्थेत सचिव, खजिनदार, मुख्याध्यापक मनमानी करीत असून मोठया प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार करीत असल्याचा येथील ग्रामस्थांचा आरोप असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या शिक्षण संस्थेतील गैरव्यवहाराची चौकशी केली आहे काय त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-११-२०१७) :** (१) याबाबतची तक्रार आढळून आली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोरपना (जि.चंद्रपुर) तालुक्यात अंबुजा कंपनीद्वारा संचालित शाळेत प्रकल्पग्रस्तांच्या पाल्यांना शैक्षणिक शुल्कात सूट देण्याबाबत**

**(१६) ८४६९६ (२१-०४-२०१७). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरपना (जि.चंद्रपुर) तालुक्यात मराठा सिमेंट उद्योग समुहाद्वारे अंबुजा सिमेंट उद्योग सुरू असून या समुहातर्फे सुरु करण्यात आलेल्या इंग्रजी माध्यमाची शाळा या उद्योगात कार्यरत कर्मचाऱ्यांच्या पाल्यांच्या शैक्षणिक शुल्कात सवलत देण्यात आलेली असून या उद्योगासाठी अधिग्रहीत करण्यात आलेल्या जमीन मालक/प्रकल्पग्रस्ताच्या पाल्यांना कोणतीही सुट देण्यात येत नसल्याने सदर शुल्कात सवलत देण्याची मागणी माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंपनीत कार्यरत प्रकल्पग्रस्तांच्या पाल्यांना शैक्षणिक शुल्कात सुट देण्यात येत असून प्रकल्पग्रस्तांच्या पाल्यांना यापासून वंचित ठेवले जात आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आलेल्या पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशी अंती काय निष्पन्न झाले वा प्रकल्पग्रस्ताच्या पाल्यांना शैक्षणिक शुल्कात शिथिलता देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-११-२०१७) :** (१) होय.

(२) नाही.

(३) व (४) याबाबतचे दि. २७ जुलै, २०१७ चे पत्र शासनास प्राप्त झाले असून याबाबत चौकशी केली असता प्रकल्पग्रस्त पाल्यांचे शैक्षणिक सवलती बाबतचा अर्ज सदर शाळेत प्राप्त झाल्यास मुख्याध्यापक संस्थेकडे पाठवून त्या पाल्यांना शैक्षणिक सवलत देण्याबाबत संस्था स्तरावरुन कार्यवाही करण्यात येत असल्याचे समजते. शाळेमध्ये जुलै, २०१७ मध्ये एका पाल्यांचा अर्ज प्राप्त झाला असून त्यांना शैक्षणिक सवलत देणेबाबत कार्यवाही केलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात शिक्षण हक्क कायद्यानुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी खासगी शाळांत राखीव असलेल्या २५ टक्के प्रवेशात सुसूत्रता आणण्याबाबत**

**(१७) ८४७९२ (२३-०८-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षण हक्क कायद्यानुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी खाजगी शाळांत राखीव असलेल्या २५ टक्के कोटयातून प्रवेश देताना काही शाळांत सहा वर्षाच्या मुलांना पहिलीत प्रवेश दिला जात असून काही खाजगी शाळा पूर्व प्राथमिकमध्ये प्रवेश देत असल्याची बाब माहे मे २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, सदर चौकशीत काय आढळून आले असल्यास, त्यानुसार शासनाने राज्यात शिक्षण हक्क कायद्यानुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी खाजगी शाळांत राखीव असलेल्या २५ टक्के प्रवेशात सुसूत्रता आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-११-२०१७) :** (१) दिनांक १० जानेवारी, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रवेशस्तर ठरविण्याचा अधिकार शाळांना दिलेला आहे.
(२) व (३) चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठामध्ये होत असलेल्या गैरकारभाराबाबत**

**(१८) ८५१९६ (२१-०८-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठामध्ये निलंबित सेवकास निवासस्थान देणे, मोठ्याप्रमाणात वृक्षतोड होणे, अनधिकृत बांधकामे करणे तसेच वित्त व लेखा विभागात आर्थिक अनियमितता होणे, अशी बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी प्रत्येक मुद्द्यावर चौकशी समिती नेमून कारवाई करण्याचे निदेश शासनाकडून देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव या विद्यापीठाचे उपकेंद्र धुळे येथे निर्माण करण्याबाबत**

**(१९) ८५२५६ (२१-०८-२०१७). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव, या विद्यापीठाचे उपकेंद्र धुळे येथे निर्माण व्हावे, अशी मागणी जिल्हावासीयांकडून वारंवार होत असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांना माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निवेदन दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई विद्यापीठाचे कल्याण (जि.ठाणे) येथील उपकेंद्राचे भूमीपुजन होऊनही सदरचे उपकेंद्र सुरु करण्यात आले नसल्याप्रकरणी विद्यार्थी संघटनांनी दिनांक ८ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास उपकेंद्राच्या परिसरात धरणे आंदोलन केले होते तसेच यासंदर्भात मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री, मा.कुलगुरु यांचेकडे दिनांक ०३ मे,२०१७ रोजी वा त्यासुमारास तक्रारी केलेल्या आहेत, हे ही खरे आहे
(३) प्रश्नोक्त भाग (१) व (२) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-११-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशतः खरे आहे. विद्यार्थी संघटनांनी दिनांक ८ मे, २०१७ पासून उपकेंद्राच्या परिसरात धरणे आंदोलन केले होते व यासंदर्भात मा.कुलगुरु यांचेकडे दिनांक ३ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास तक्रारी केलेल्या आहेत.

(३) उपकेंद्राबाबत धोरण निश्चित करण्यासाठी डॉ.योगानंद काळे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने अहवाल शासनास सादर केला असून सदर अहवालानुसार उपकेंद्राबाबतचे धोरण स्विकारावे किंवा कसे ही बाब तपासण्यात येत असल्याने त्यावर शासनस्तरावर अद्याप निर्णय घेण्यात आलेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शहरातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठातील ३७३ पदांचा पदानुशेष भरण्याबाबत**

**(२०) ८६१२८ (२१-०८-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात १५१ शिक्षकेत्तर कर्मचारी आणि २२२ प्राध्यापक असा एकुण ३७३ पदांचा पदानुषेश भरण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रलंबित प्रस्तावानुसार प्राध्यापक-५३, सहयोगी प्राध्यापक-८९, सहायक प्राध्यापक-१९२, शिक्षक समकक्ष-१९, गट-अ-६०, गट-ब-५२ पदे मंजुर असुन त्यापैकी प्राध्यापक-२७ सहयोगी प्राध्यापक-४६, सहायक प्राध्यापक-६८, शिक्षक समकक्ष-९, गट-३-३८, गट-ब-३४ ही पदे अनेक वर्षापासून रिक्त असुन त्याचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासावर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रलंबित असलेल्या पदानुषेश प्रस्तावाला मंजुरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-११-२०१७) :** (१) हे अंशतः खरे आहे.

नमूद विद्यापीठातील रिक्त असलेल्या १५१ शिक्षकीय पदांपैकी ७४ पदांच्या पदभरतीस मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव संचालक, उच्च शिक्षण यांच्या मार्फत दि. २ जून, २०१७ रोजी शासनास प्राप्त झालेला आहे. तथापि, वित्त विभागाने दिनांक २५ मे, २०१७ च्या शासन निर्णयान्वये जे विभाग आकृतीबंध अंतिम मंजूर करुन घेणार नाहीत. तोपर्यंत पदभरतीस, पदनिर्मिती तसेच पदे रुपांतरीत करण्यास मंजूरी देता येणार नाही अशा सूचना दिलेल्या आहेत.

(२) हे अंशतः खरे आहे.

पर्यायी व्यवस्था निर्माण करून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासावर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता विद्यापीठाद्वारे घेतली जात आहे.

(३) वित्त विभागाने दिनांक ११.०२.२०१६, दिनांक २५.०५.२०१७ व दिनांक २९.०६.२०१७ अन्वये सूचित केल्यानुसार राज्यातील अकृषि विद्यापीठांमधील शिक्षकीय व शिक्षकेत्तर पदांचे सुधारित आकृतिबंध निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाच्या शैक्षणिक विकासासाठी जाहिर केलेल्या निधीबाबत**

**(२१) ८६२१५ (२१-०८-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त्त तत्कालिन मुख्यमंत्री यांनी शैक्षणिक विकासासाठी जाहिर केलेल्या रुपये ५० कोटी निधीपैकी फक्त रुपये पाच कोटी ५० लाखांचा निधी प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित निधी मिळण्याकरिता विद्यापीठांमार्फत मा.मुख्यमंत्री, मा.शिक्षणमंत्री यांच्याकडे पाठपुरावा केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उर्वरित निधी देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-११-२०१७) :** (१) कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त विविध विद्याशाखा / प्रकल्प सुरु करण्यासाठी अनावर्ती खर्चासाठी रुपये ४०.३३ कोटी इतक्या खर्चास दि.१७.०१.२०१३ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून त्यापैकी आतापर्यंत रु.३,५४,९९,९९५/- इतका निधी शासनाने उपलब्ध करुन दिला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सन २०१७-२०१८ मध्ये अर्थसंकल्पित केलेल्या रु.५०.०० लक्ष निधीपैकी ७०% च्या मर्यादेत रु.३५.०० लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात विश्व विद्यालय आयोगाने जाहीर केल्याप्रमाणे जागतिक दर्जाची २० अभिमत विद्यापीठे स्थापन करण्याच्या मागणीबाबत**

**(२२) ८६४३९ (२१-०८-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विश्व विद्यालय आयोगाने जाहीर केल्याप्रमाणे जागतिक दर्जाची २० अभिमत विद्यापीठे स्थापन करण्यासाठी शासनाने सुयोग्य धोरण जाहीर करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान मा.शालेय शिक्षण मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विद्यापीठांमुळे गुणवंत व सक्षम पिढी घडत असून सार्वजनिक क्षेत्रामध्ये मोठया प्रमाणावर निधी उपलब्ध होणे कठीण असले तरी खाजगी क्षेत्रांमध्ये नविन विद्यापीठ स्थापनेसाठी पुरेसा निधी उपलब्ध होऊ शकतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त विद्यापीठे स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-११-२०१७) :** (१) होय.
(२) होय.
(३) शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई गोरेगाव पूर्व येथील गुरुकुल व हरणाई या खाजगी अनुदानित मराठी माध्यमांच्या विद्यालयामध्ये झोपडपट्टीतील विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारले जात असल्याबाबत

**(२३) ८६४६२ (२३-०८-२०१७). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई गोरेगाव पूर्व परिसरातील झोपडपट्टी भागामध्ये खाजगी अनुदानित तत्त्वावर चालू असणाऱ्या गुरुकुल व हरणाई या मराठी माध्यमांच्या विद्यालयामध्ये सन २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षाकरिता झोपडपट्टीतील विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारले जात असल्याचे माहे एप्रिल २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच, सदरच्या दोन्ही शाळा या एकाच संस्थापकाच्या असल्याने शाळेतील शिक्षक व विद्यार्थी, पालकांमध्ये संस्थापकांचा शाळा बंद करण्याचा मानस असल्याची भीती व्यक्त होत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईमध्ये मराठी माध्यमांच्या शाळा एकीकडे बंद पडत असताना तसेच सदरच्या दोन्ही शाळा या चांगल्या पद्धतीने चालू असतानाही संस्थापकांचा शाळा बंद करण्याचा मानस आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच उक्त शाळेवर प्रशासक नेमणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-११-२०१७) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अनुदानीत शाळामध्ये मान्यता प्राप्त विनाअनुदान दर्जाचे तुकडयांचे मुल्यांकन अद्यापही झालेले नसल्याबाबत**

**(२४) *८६४६५* (२३-०८-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वच पात्र कायम विनाअनुदानीत शाळांना अद्यापही २० टक्के अनुदान मिळालेले नसल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्वच पात्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना घोषित करुन १०० टक्के अनुदान केव्हा पासून देण्यात येणार आहे,

(३) असल्यास, ज्या शाळांना २० टक्के अनुदान दिलेले आहे, त्यांना पुढील ४० टक्क्यांचा टप्पा केव्हा देण्यात येणार आहे,

(४) असल्यास, प्रश्न भाग २ व ३ बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (३१-१०-२०१७) :** (१) नाही.

(२) व (३) दिनांक १४ जून, २०१६ पूर्वी अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या माध्यमिक शाळांना शासन निर्णय दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ अन्वये सरसकट २० टक्के प्रमाणे अनुदान मंजूर करण्यात आले. तसेच दिनांक १ फेब्रुवारी, २०१७ च्या शासन निर्णयान्वये पात्र शाळांना अनुदान वितरीत करण्यात आले आहे. मंत्रीमंडळाच्या दिनांक ३० ऑगस्ट, २०१६ च्या बैठकीतील निर्णयानुसार शासनाच्या पुढील आदेशापर्यंत शाळांना २० टक्के अनुदान देण्यात आले आहे. उच्च माध्यमिक शाळांच्या मूल्यांकनाबाबतच्या प्रस्तावांवर क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शिक्षकांना १२ वर्षानंतर कालबध्द पदोन्नती देण्याबाबत**

**(२५) *८६५०६* (२३-०८-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना १२ वर्षानंतर कालबध्द पदोन्नती देण्यात येते, मात्र शिक्षकांना १२ वर्षानंतर कालबध्द पदोन्नती देण्यात येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शासनाने राज्यातील शिक्षकांना १२ वर्षानंतर कालबध्द पदोन्नती देवून त्यांना २० टक्के पगारवाढ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-११-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) केंद्र शासनाने नेमलेल्या चट्टोपाध्याय समितीच्या शिफारशीनुसार दिनांक २.९.१९८९ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील शिक्षकांना १२ वर्षाची वरिष्ठ वेतनश्रेणी व २४ वर्षाची निवडश्रेणी काही अटीच्या अधीन लागू केलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्हयातील अल्पसंख्याक मॅट्रीकपुर्व शिष्यवृत्तीचे विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्याबाबत**

**(२६) ८६८८७ (२१-०८-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्हयातील अल्पसंख्याक मॅट्रीकपुर्व शिष्यवृत्तीचे १२ शाळांतील विद्यार्थ्यांचे नूतनीकरण प्रलंबित असल्याने उक्त विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त शाळेतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती त्वरीत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-११-२०१७) :** (१) नाही. हिंगोली जिल्हयातील एकूण ८० शाळांपैकी ZPPK S.K. Wasmat Ta. Basmat या एकाच शाळेतील २० विद्यार्थ्यांचे नुतनीकरणाचे काम प्रलंबित आहे.
(२) या प्रकरणी चौकशी केली असता संबंधित शाळेस ऑनलाईन कामकाजाविषयक समस्या येत असल्याने सदर २० विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन अर्जाची पडताळणी होवू शकली नसल्याचे समजते. प्रस्तुत प्रकरणी संबंधित मुख्याध्यापकास जबाबदार धरुन त्यांना कारणे दाखवा नोटिस देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची शैक्षणिक शुल्काची रक्कम थकीत असल्याबाबत**

**(२७) ८६९६३ (२१-०८-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची शैक्षणिक शुल्काची रक्कम मोठया प्रमाणात शासनाकडे थकीत असून एकटया नाशिक जिल्हयाची सदर रक्कम ५० कोटीहून अधिक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शैक्षणिक शुल्काची एकूण रक्कम किती आहे,
(३) असल्यास, शासनाने सदर थकीत रक्कम महाविद्यालयांना लवकरात लवकर देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-११-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) तंत्र शिक्षण संचालनालयाकडे राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजनेंतर्गत एकूण रु.३८.६२ कोटी इतकी रक्कम प्रलंबित आहे. तसेच उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजनेंतर्गत फरकाची रु.८९,७५,१४५/- इतकी रक्कम प्रलंबित असून सदर रक्कम अदा करणेबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्हयातील शिक्षण विभागाच्या प्रलंबित असलेल्या अनुदानाबाबत**

**(२८) ८६९७१ (२३-०८-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील शिक्षण विभागाचे प्रलंबित असलेले २१ कोटी ३६ लाख रुपयांचे अनुदान व सिंधुदुर्ग जिल्हापरिषद शिक्षण विभागाचे ४ टक्के सादिल वेतनेत्तर अनुदान तात्काळ शासनाने मंजूर करावे अशी मागणी अखिल सिंधुदुर्ग जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाने मा.शिक्षण मंत्र्यांकडे निवेदनाव्दारे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्हयाच्या शिक्षण विभागाचे अनुदान न देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (३१-१०-२०१७) :** (१) होय.
(२) व (३) शासन परिपत्रक, वित्त विभाग दिनांक १७ एप्रिल, २०१५ नुसार, स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदाने वितरीत करण्यापूर्वी सदर संस्थाकडून राज्य शासनास येणे असणारी रक्कम वसूल करुनच उर्वरीत अनुदान वितरीत करण्यात यावे असे आदेश आहेत. सिंधुदुर्ग जिल्हा

परिषदेकडून रुपये २२,०७,२३,३६७/- इतकी अखर्चित वसुलपात्र रक्कम शासनाकडे येणे बाकी आहे. सदर रक्कम शासनाकडे जमा केल्यानंतर सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेस वेतनेत्तर अनुदान वितरीत करण्याची कार्यवाही करता येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उस्मानाबाद येथे स्वतंत्र विद्यापीठ सुरु करणेबाबत**

**(२९) ८७२७९ (२१-०८-२०१७). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद येथे विद्यापीठाचे उपकेंद्र सुरु असून उस्मानाबाद येथे स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्यासंबधीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने उस्मानाबाद येथे स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करणेबाबतच्या प्रस्तावावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगांव (जि.नाशिक) येथे नवीन शासकिय औद्योगिक प्रशिक्षण केंद्र (आयटीआय) सुरू करण्याबाबत**

**(३०) ८८१४२ (०४-०९-२०१७). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव (जि.नाशिक) येथे शासनाच्या अल्पसंख्यांक विभागाने नवीन शासकिय औद्योगिक प्रशिक्षण केंद्र (आयटीआय) देण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये मान्यतेकरीता दाखल केला असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मालेगांव शहर व आसपासच्या परिसरात अल्पसंख्यांक गोरगरीब वर्गातील नागरिक राहत असुन त्यांना मालेगांव येथे शासकिय औद्योगिक प्रशिक्षण केंद्र नसल्याने या तांत्रिक शिक्षणाकरिता बाहेर जावे लागते परंतु आर्थिक परिस्थिती व ये-जा करण्याकरिता लागणारा वेळ या गैरसोयीमुळे अल्पसंख्याक गोरगरीब समाजातील होतकरु विदयार्थी-विदयार्थीनी शासकिय औद्योगिक प्रशिक्षण केंद्रातून व्यावसायिक पद्धतीचे शिक्षण घेऊ शकत नाहीत, हे लक्षात घेता शासनाने नवीन शासकिय औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करीत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-११-२०१७) :** (१) व (२) मालेगांव (ता.जि.नाशिक) येथे अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी नवीन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्र (आयटीआय) सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे स्वायत्त नाशिक कॅम्पस**
**सुरु करण्याकरिता मान्यता देण्याबाबत**

**(३१) ८९१७२ (२१-०८-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नाशिक उपकेंद्राचे सक्षमीकरण करुन विद्यापीठाचे स्वायत्त नाशिक कॅम्पस सुरु करण्याकरिता दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ रोजी वा त्या सुमारास झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील अकृषी विद्यापीठाअंतर्गत उपकेंद्र निर्मितीसाठी समान धोरण निश्चित करण्याकरिता दिनांक २८ एप्रिल २०१५ च्या शासन निर्णयानुसार स्थापन केलेल्या समितीने शासनास अहवाल सादर केलेला आहे , हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने प्रश्नोक्त भाग (१) व (२) नुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नाशिक कॅम्पसला मंजुरी देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-११-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) डॉ.योगानंद काळे समितीच्या अहवालानुसार उपकेंद्राबाबतचे धोरण स्विकारावे किंवा कसे ही बाब तपासण्यात येत असल्याने त्यावर शासनस्तरावर अद्याप निर्णय घेण्यात आलेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी जनता साप्ताहिकातून केलेले लिखाण अप्रकाशित असल्याबाबत**

**(३२) ८९२०६ (२१-०८-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे सन १९३० ते १९५५ या काळात प्रकाशित झालेल्या जनता साप्ताहिकामधील लेखनाचे मूळ दस्तऐवज डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीस प्राप्त झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या साप्ताहिकातील लिखाण प्रकाशित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-११-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नागपूर विद्यापीठाकडून समितीला मूळ दस्ताऐवज प्राप्त झाले असून प्रकाशनाबाबतची प्रक्रिया सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सर्व माध्यमांच्या प्राथमिक उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये तक्रार पेट्या बसविण्याबाबत**

**(३३) ८९३१८ (२३-०८-२०१७). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), डॉ.राहूल पाटील (परभणी), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व माध्यमांच्या प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये तक्रार पेटया बसविण्याची योजना दिनांक ५ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदर तक्रार पेटयां सर्व शाळांमध्ये बसविण्याबाबत व तक्रार पेटयामध्ये येणाऱ्या तक्रारी सोडविण्याबाबत शासनाने कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-११-२०१७) :** (१) होय.

(२) शाळांमधील विद्यार्थी, विद्यार्थीनी व शिक्षिका यांच्या सुरक्षिततेसाठी करावयाच्या उपाययोजनांचा भाग म्हणून प्रत्येक शाळेमध्ये तक्रारपेटी बसविणे आवश्यक करण्यात आले आहे.

(३) शासन निर्णय, दि. ०५ मे, २०१७ अन्वये प्रत्येक शाळेमध्ये तक्रार पेटी बसविणे आवश्यक ठरविण्यात आले आहे. गंभीर व संवेदनशील स्वरुपाच्या तक्रारीबाबत पोलिस यंत्रणांचे आवश्यकता असल्यास सहाय्य घेण्यात येते. तक्रार पेटीत प्राप्त सर्व तक्रारींची नोंद घेऊन तक्रार निवारण करण्याबाबत तात्काळ आवश्यक ती कार्यवाही/उपाययोजना करण्यात येते. शाळेतील विद्यार्थीनी/शिक्षिका यांच्या लैंगिक छळाबाबतच्या तक्रारी महिला तक्रार निवारण समितीसमोर ठेवण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील खाजगी शाळातील ग्रंथपालांना पदवीधर वेतनश्रेणी देण्याबाबत

**(३४) ८९९०३ (२३-०८-२०१७). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी शाळातील ग्रंथपालांना पदवीधर वेतनश्रेणी देण्याबाबत उच्च न्यायालयाच्या तिनही खंडपीठांनी सुमारे ३०० पेक्षा अधिक निकाल ग्रंथपालांच्या बाजूने देण्यात येवूनही पदवीधर वेतन श्रेणी पासून ग्रंथपाल वंचित असल्याने याबाबत महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषद, पालघर यांनी मा.मुख्यमंत्री व मा.शालेय शिक्षण मंत्री यांना दिनांक २८ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्या दरम्यान निवेदन देवूनही अद्यापही ग्रंथपालांच्या मागण्या मान्य करण्यात आल्या नसल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्रंथपालांना पदवीधर वेतन श्रेणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-११-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) पदवीधर ग्रंथपालांच्या पदवीधर वेतनश्रेणीबाबत बरीच मतभिन्नता आहे. या संदर्भात असलेली मतभिन्नता दूर करण्यासाठी शासनाने दिनांक १४ जुन, २०१६ रोजी सविस्तर व सुस्पष्ट परिपत्रक निर्गमित केले आहे. अवमान याचिका क्र. ४०८/२०१५ व इतर एकूण ३५ अवमान याचिकांची एकत्रित सुनावणी घेऊन मा.उच्च न्यायालयाने दिनांक २६.१०.२०१६ रोजीच्या आदेशान्वये शासनाचे दिनांक १४.६.२०१६ चे परीपत्रक योग्य ठरविले आहे.

---

### ठाणे व पालघर जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे वेतन ठाणे जनता सहकारी बँकेमार्फत सुरु करण्याबाबत

**(३५) ८९९९९ (२३-०८-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व पालघर जिल्ह्यातील मान्यताप्राप्त अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळातील सुमारे २०,४९६ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँकेमार्फत देण्यात येणारे वेतन बंद करून ठाणे जनता सहकारी बँकेमार्फत सुरु करण्याचा निर्णय शासनाने दिनांक १५ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे जिल्हयातील शिक्षकांचे ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँकेमार्फत (टीडीसीसी) दिले जाणारे वेतन बंद करुन इतर बँकेतुन वेतन देण्याचा घेतलेल्या निर्णयाविरोधात शिक्षक संघटना व लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ जुन, २०१७ रोजी तसेच वारंवार मा.मुख्यमंत्री, मा.शालेय शिक्षण मंत्री तसेच प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांचेकडे मागण्या केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने बृहन्मुंबई तसेच मुंबईतील खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्त्यांचे प्रदान मुंबई जिल्हा मध्यवर्ती तसेच सहकारी बँकेमार्फत करण्याचा निर्णय घेतला असल्याने या निर्णयाच्या विरोधात शिक्षकांनी दिनांक २२ जून, २०१७ रोजी चेंबूर येथील शिक्षक निरीक्षक कार्यालयासमोर आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शिक्षक तसेच शासकीय कर्मचा-यांचे वेतन नॅशनल बँकेत काढण्याचा वित्त विभागाचा शासन निर्णय असूनही शिक्षकांचे पगार उपरोक्त सहकारी बँकेतून देण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-११-२०१७) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) व (५) वित्त विभागाच्या दिनांक २९.८.२००५ च्या शासन निर्णयामध्ये शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते यांचे प्रदान राष्ट्रीयकृत बँकेमार्फत करण्याचा उल्लेख आहे. तथापी त्यामध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा उल्लेख नाही. मात्र शासन निर्णय दिनांक २९.५.१९७३ नुसार शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा पगार सहकारी बँकामधून करण्यात येतो. त्यानुसार बृहन्मुंबईसाठी मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकामधून करण्यात येतो.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## साक्री (जि.धुळे) तालुक्यातील क्रीडा संकूल व इमारतीच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला निधी

**(३६) ९०२४८ (२१-०८-२०१७). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री (जि.धुळे) तालुक्यातील क्रीडा संकूल व इमारतीच्या उर्वरित कामासाठी क्रीडा विभागाने ५७ लाखाचा निधी उपलबध करुन दिला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निधीतून इमारत कार्यालय व खेळाची मैदाने यांची कामे निविदा प्रक्रिया राबवून सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) साक्री तालुका क्रीडा संकुलासाठी टप्याटप्याने रु.१००.०० लक्ष वितरीत करण्यात आले असून सदर निधीमधून बॅडमिंटन हॉल (टेराफ्लेक्स फ्लोरिंगसह), विद्युतीकरण, कार्यालय, रंगकाम इ. सुविधा पूर्ण करण्यात आलेल्या आहेत. तसेच उर्वरित निर्माण करावयाच्या विविध क्रीडा सुविधांकरिता निविदा प्रक्रीया पूर्ण करुन दिनांक ०४.०३.२०१७ रोजी कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यामध्ये विविध खेळांची मैदाने, बास्केटबॉल कोर्ट, मल्टीपर्पज हॉल, टेबल टेनिस हॉल इ. क्रीडा सुविधा निर्मितीचे काम असून बांधकाम प्रगती पथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीकडुन ३८ वर्षांत इंग्रजी खंडापैकी एकही मराठी अनुवाद प्रकाशित न केल्याबाबत**

**(३७) ९०५४९ (२१-०८-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीने, महाराष्ट्र शासनाच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे साहित्य अदयाप पर्यंत प्रकाशित केले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत ३८ वर्षांत इंग्रजी खंडापैकी एकही मराठी अनुवाद प्रकाशित करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गत ३ वर्षात सदर समितीची एकही बैठक झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय ?

**श्री. विनोद तावडे (०९-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीने एकूण ३२ खंड प्रकाशित केले असून त्यापैकी इंग्रजी २५ व मराठी ७ खंड प्रकाशित करण्यात आले आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील हिंदकेसरीसह महाराष्ट्र केसरी जेष्ठ मल्लांचे मानधन प्रलंबित असल्याबाबत**

**(३८) ९०८२० (२१-०८-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ७ हिंदकेसरीसह ३० हून अधिक महाराष्ट्र केसरी जेष्ठ मल्लांचे मानधन गत सहा महिन्यापासून प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याकरीता सातत्याने अर्ज विनंत्या करुनही शासन त्याकडे दुर्लक्ष करित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर मल्लांच्या मानधनात वाढ करुन त्यांचे थकीत मानधन त्यांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०१-११-२०१७) :** (१), (२) व (३) मार्च २०१७ अखेर, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरवार अतुलनीय कामगिरी महाराष्ट्र राज्यातील वयोवृध्द खेळाडूंच्या मानधनाची रक्कम सर्व लाभार्थी खेळाडूंना अदा करण्यात आली आहे. तसेच सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता वयोवृध्द खेळाडूंना मानधन अदा करण्यासाठी रु.२१.०० लक्ष इतका निधी वितरीत करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**छत्रपती शिवाजी महाराजाचे अधिकृत चरित्र शासनाने लिहुन सही-शिक्यानिशी प्रकाशित करण्याबाबत**

**(३९) ९०९२३ (२१-०८-२०१७). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती शिवाजी महाराजाचे अधिकृत चरित्र शासनाने लिहुन सही-शिक्यानिशी प्रकाशित करण्याची मागणी महाराष्ट्रातील अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी शासनाकडे वेळोवेळी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, छत्रपती शिवाजी महाराजाच्या जन्मतिथीसह जीवनातील विविध घटनांबाबत इतिहासकारांमध्ये आजही दुमत व संभ्रम आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-११-२०१७) :** (१) अंशतः खरे आहे. राज्य शासनाने अधिकृत शिवचरित्र प्रसिद्ध करावे व राज्याचे शैक्षणिक धोरणामध्ये त्याचा समावेश करुन, शालेय अभ्यासक्रमामध्ये समावेश करण्याबाबतचा मराठा मंडळ, इचलकरंजी, जि.कोल्हापूर यांचा ठराव प्राप्त झाला आहे. त्यानुषंगाने त्याची प्रत शालेय शिक्षण विभागाकडे पाठविण्यात आली आहे.
(२) होय.

(३) शिवचरित्राचे राज्याच्या शैक्षणिक धोरणात समावेश करण्याबाबतची कार्यवाही शालेय शिक्षण विभागामार्फत करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर सरकारी ग्रंथ समितीच्या कार्यालयास प्रशस्त मोठी जागा देण्याबाबत**

**(४०) ९१३३१ (२१-०८-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहात्मा जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज व भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर या तिन्ही महापुरुषांच्या चरित्र साधने प्रकाशन समितीची कार्यालये ही शासकीय बॅरेक नं.१८ मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर सरकारी ग्रंथ कार्यालयात गेली २५ वर्षे कार्यरत असून या प्रशस्त जागेतून चरित्र साधने प्रकाशन समितीचे कामकाज चालत होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील मेट्रो प्रकल्पाच्या आड सदरचे कार्यालय आल्याने शासनाने या कार्यालयाची जागा ठाकरसी हाऊस पहिला मजला, विदेश टपाल, मुख्यालयासमोर सेंट्रल बँक इमारत, ग्रॅण्ड हॉटेल शेजारी, बलार्ड पीअर मुंबई येथील अवघ्या ३२५ चौ.फू.च्या अल्पश्या जागेत हलविल्याची बाब मे, २०१७ मध्ये निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दुर्मिळ ग्रंथ, हस्तलिखिते महत्वाची कागदपत्रे व दुर्मिळ मुर्ती यासारखी ग्रंथसंपदा ठेवण्यासाठी कार्यालयात जागा शिल्लक नाही तसेच चरित्र साधने प्रकाशन समितीच्या संपादकांना बसण्यासही पुरेशी जागा नसून, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे दुर्मिळ दस्तऐवज आणि पुस्तके यांचे ढिग छतापर्यंत पोहचले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अपूऱ्या जागेमुळे ही महत्वाची ग्रंथ संपदा जतन करणे अत्यंत कठीण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर सरकारी ग्रंथ कार्यालयास प्रशस्त मोठी जागा देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-११-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.
दि.१ सप्टेंबर, २०१७ पासून दुसरी पुरेशी जागा समिती कार्यालयास मिळालेली आहे.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.
(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, २०१६ या कायदा नियमावलीच्या प्रतिक्षेत असल्याबाबत**

**(४१) ९२०५५ (२१-०८-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील विद्यापीठांचा दर्जा उंचावण्यासाठी राज्य शासनाने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, २०१६ हा दिनांक १ मार्च, २०१७ पासून संपूर्ण राज्यभरात लागू केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कायद्याची नियमावली मंजूर करण्यात आलेली नसल्याने त्याचे दुष्परिणाम राज्यातील विद्यापीठांवर होत असून विद्यापीठ संलग्नित अनेक समित्या, प्राधिकरण, नियुक्त्या व इतर अनेक कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने प्रश्नोक्त भाग (२) बाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच कायद्याच्या नियमावलीच्या मंजुरीची सद्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०९-११-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२ हे खरे नाही.

(३) शासनाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम २७ अन्वये दि.२८/४/२०१७ च्या अधिसूचनेन्वये विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा सदस्य म्हणून निवडून येण्याच्या, नामनिर्देशित करण्याच्या अथवा स्वीकृत करून घेण्याच्या पात्रता शर्ती विनिर्दिष्ट केल्या आहेत. तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ६७, ७१ व ७२ मधील तरतुदीन्वये प्राप्त अधिकारात विद्यापीठाची विविध प्राधिकरणे व मंडळे यांच्या निवडणूका घेण्याच्या कार्यपद्धती विषयीचे एकरुप परिनियम क्र.१ ते ३ दि. १७ मे, २०१७ च्या अधिसूचनेन्वये विहित केले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई विद्यापीठाच्या कालिना संकुलातील ग्रंथालयाच्या बांधकामाच्या दिरंगाईबाबत**

**(४२) ९२५६२ (२१-०८-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या कालिना संकुलातील ग्रंथालयाचे बांधकाम गेली दिड वर्षे संथगतीने सुरु असल्याने दोन कोटी ४७ लाखांचा वाढीव खर्च विद्यापीठाला करावा लागणार असल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बांधकामाच्या दिरंगाईने आर्थिक भुर्दंड सोसावा लागण्यास जबाबदार असणा-या व्यक्तींची चौकशी करण्याची मागणी मा. राज्यपालांकडे माहिती अधिकार कार्यकर्ते यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने प्रश्नोक्त बाब १ व २ नूसार चौकशी केली आहे काय,
असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणा-या व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-११-२०१७) :** (१) हे अंशतः खरे आहे. काम सुरु असताना विद्युत पुरवठा व फायर डिपार्टमेंटच्या सूचनांच्या आधारे कामाचा आवाका वाढल्याने खर्च रु.२,४६,६०,२७४.४७/- रकमेने वाढला आहे. तथापि, कंत्राटदारास कुठलीही जादा रक्कम देण्यात आलेली नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क कायद्यांतर्गत**
**शैक्षणिक खर्चाची रक्कम वेळेवर मिळत नसल्याबाबत**

**(४३) ९२९६९ (२३-०८-२०१७). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गरीब बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क कायद्यांतर्गत खाजगी शाळांमधील २५ टक्के राखीव जागांवर गरीब विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत असता तरी प्रत्येक विद्यार्थ्यामागे येणा-या शैक्षणिक खर्चाची रक्कम राज्य सरकारकडून वेळेवर मिळत नसल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षण हक्क कायद्यानुसार २५% कोट्यामधून प्रवेश घेतलेल्या बालकांना लेखन साहित्य, पाठयपुस्तके आणि गणवेश मोफत मिळणे बंधनकारक असून सरकारी शाळांमध्ये प्रत्येक बालकामागे जितका खर्च राज्य सरकार करते, तितकी रक्कम २५% कोट्यातून प्रवेश घेतलेल्या बालकांचे शुल्क व इतर शैक्षणिक खर्च खासगी शाळांना देण्यात येईल असे शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आले असल्याने, त्यानुसार ही रक्कम सरकारकडून महानगरपालिकेमार्फत खासगी शाळांना देण्यात येते ती वेळेत न मिळाल्याने गरीब पालकांना त्याचा भुर्दंड सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-११-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, विद्यापीठाच्या विविध विभागात अनेक सोयी सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(४४) ९३१०३ (२१-०८-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, विद्यापीठाकडे सन २०१५-१६ या कालावधीत ५५६ कोटी ३५ लाख ९ हजार ९०७ रूपयाच्या ठेवी जमा असूनही विद्यापीठाच्या वसतीगृहे, कार्यालये, कॅम्पस परीसरमध्ये अनेक सोयी सुविधांचा अभाव असल्याबाबत माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठाकडे सन २०१२-१३ या कालावधी २०५ कोटी ८५ लक्ष ९३ हजार २५२ रूपयांच्या ठेवी जमा असून गत चार वर्षाच्या कालावधीत ३५० कोटी ४९ लाख १६ हजार ६५५ रूपयाची वाढ झालेली असून त्यावर १०४ कोटी ७४ लाख ४६ हजार रूपयांचे व्याज देखील प्राप्त झालेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर विद्यापीठाकडे जमा असलेल्या ठेवींमधून विद्यार्थ्यांकरिता सोयी सुविधा तसेच वाढ केलेल्या शिक्षण शुल्का मध्ये कपात करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे, काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाकडे दिनांक ३१/३/२०१६ रोजी पर्यंत ५२६ कोटी २५ लक्ष ८ हजार ९१६ रुपयाच्या मुदतठेवी आहेत. तसेच विद्यापीठातील वसतिगृहे, कार्यालये व कॅम्पस परिसरात आवश्यक सोयी सुविधा पुरविण्यात आल्या असून अधिक व अद्यावत सोयी सुविधा पुरविण्यासाठी सन २०१७-१८ वर्षाच्या अर्थसंकल्पात विविध व्ययशिर्षांतर्गत भरीव तरतूद करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाकडे दिनांक ३१/३/२०१३ रोजी पर्यंत १८३ कोटी ८४ लक्ष ९ हजार ८४५ रुपयाच्या मुदतठेवी असून आर्थिक वर्ष २०१२-१३ ते २०१५-१६ या कालावधीत ३४२ कोटी ४० लक्ष ९९ हजार ७१ रुपयाची वाढ झाली असून वर्ष २०१२-१३ ते २०१५-१६ या कालावधीत विद्यापीठाला १०४ कोटी ७४ लक्ष ४६ हजार रुपयाचे व्याज प्राप्त झाले आहे.

(३) हे खरे नाही.

सन २०१७-१८ या वर्षाच्या अर्थसंकल्पात विद्यार्थ्यांच्या सोयी सुविधा करिता खालीलप्रमाणे भरीव तरतूदी करण्यात आल्या आहेत.

१) बांधकामाकरिता.

अ) विद्यार्थी भवन रु. १ कोटी.

ब) नवीन वसतिगृह रु.१ कोटी.

क) मुलींचे वसतिगृह रु.२० लक्ष.

ड) विद्यापीठ ग्रंथालय रु.१ कोटी (विद्यापीठ परिसर)

इ) विद्यार्थी प्रशिक्षण केंद्र रु.१.५० कोटी.

ई) विद्यापीठ रोजगार आणि माहिती केंद्र रु.४० लक्ष.

२) उपस्कर व उपकरणे.

अ) वसतिगृहातील उपस्कर व उपकरणे खरेदी रु.३९ लक्ष.

ब) वर्गखोल्याचे उपस्कर, डिजीटलाईजेशन, स्मार्ट क्लास रुम, वसतिगृहात सोलर एनर्जी उपकरणे व इतर सोयी सुविधांसाठी रु.१० कोटी.

क) परिक्षा निकालांचे संगणकीकरण  रु.८ कोटी.

३) वैज्ञानिक, तांत्रिक व प्रयोगशाळा उपकरणे रु.१ कोटी ८४ लक्ष.

४) ग्रंथालयीन पुस्तके व नियतकालिके  रु.७१ लक्ष.

५) विविध शैक्षणिक विभाग, स्वच्छतागृहे व वसतिगृहे यांचे दुरुस्ती व देखभालाकरिता रु.१० कोटी.

६) संशोधन शिष्यवृत्ती रु.१ कोटी

७) विद्यार्थी कल्याण योजना (विद्यार्थी सहायता, वैद्यकीय सहायता व कल्याण योजना) रु.१ कोटी ३५ लक्ष.

वरील सोयी सुविधांकरिता शिक्षण शुल्कात मागील ५ वर्षात कोणतीही वाढ करण्यात आली नाही. त्यामुळे कपात करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शाळकरी विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी करण्याबाबत**

**(४५) ९३३५१ (२३-०८-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण विभागाने शाळकरी विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी गत शैक्षणिक सत्रापासून शिक्षणाधिकारी कार्यालयाने प्राथमिक विद्यार्थ्यांचे दप्तराचे वजन करुन प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेला शासनाला अहवाल सादर करण्याचे निदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निदेशाची अंमलबजावणी किती शाळांनी केली आहे,

(३) असल्यास, उक्त अहवाल सादर न केलेल्या शाळांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-११-२०१७) :** (१) होय.

(२) सरसकट सर्व शाळांमधून तपासणी केली जात नाही. शासन पत्र क्र. न्यायाप्र-१८१५/(२६/१५) /एसडी-४, दि.९/६/२०१६ अन्वये विद्यार्थ्यांच्या दप्तराची यादृच्छिकपणे (Randomly) तपासणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

(३) शासन परिपत्रक क्र. दओझे-१८१५/ प्र.क्र.१६५/एसडी-४, दि.५/११/२०१५ अन्वये विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी करण्याबाबत करावयाच्या उपाययोजनांबाबत निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी शाळेचे मुख्याध्यापक यांच्यावर निश्चित करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील क्रीडापटूंच्या आर्थिक मदतीसाठी ऑलिम्पिक व्हिजन कृती आराखडा आखण्याच्या शासनाच्या निर्णयाबाबत

**(४६) ९३५२३ (२१-०८-२०१७). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील क्रीडापटूंनी २०२०, २०२४, २०२८ व २०३२ या वर्षात होणा-या ऑलिम्पिक क्रिडा स्पर्धात प्राविण्य मिळावावे यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळण्याकरिता आर्थिक मदतीसाठी ऑलिम्पिक व्हिजन कृती आराखडा आखण्याचा निर्णय राज्याच्या क्रिडा व युवक सेवा मंत्रालयाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यानुसार मुंबई शहर जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांनी, खेळाडूंच्या वैयक्तिक व क्रीडाक्षेत्रातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कामगिरीतील आढावा घेऊन खेळाडूंना ऑलिम्पिकसाठी सज्ज करण्याचा महत्वाकांक्षी कार्यक्रम आखला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याकरिता जिल्हा क्रिडा अधिकाऱ्यांनी राज्यातील जिल्हा निहाय प्राविण्यप्राप्त खेळाडूंनी वैयक्तिक व खेळांबाबतची माहिती विविध नमुन्यात शिक्षण विभागाच्या संकेतस्थळावर भरण्याबाबतचे निदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, किती खेळाडूंनी शिक्षण विभागाच्या संकेतस्थळावर माहिती सादर केली आहे, असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-११-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) माहे जुलै, २०१७ पासून ते माहे सप्टेंबर, २०१७ या कालावधित एकूण ७८२ खेळाडूंनी शिक्षण विभागाच्या संकेतस्थळावर माहिती सादर केलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाकडून वेतनापोटी येणारी सात ते आठ कोटी रुपयांची रक्कम मुंबई विद्यापीठास प्राप्त झाली नसल्याबाबत**

**(४७) ९३६७० (२१-०८-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाकडून वेतनापोटी येणारी सुमारे सात ते आठ कोटी रुपयांची रक्कम गत तीन महिन्यांपासून मुंबई विद्यापीठास मिळाली नसल्याची बाब माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) परिणामी मुंबई विद्यापीठातील सुमारे ४७० कंत्राटी कर्मचाऱ्यांना मुंबई विद्यापीठाने सेवेतून तडकाफडकी कमी केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने मुबई विद्यापीठास पगारापोटी द्यावयाची थकीत रक्कम तातडीने अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, शासनाने मुंबई विद्यापीठात वर्षानुवर्षे कंत्राटी स्वरुपात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना शासन सेवेत कायम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-११-२०१७) :** (१) हे खरे आहे, तथापि, दि. २४.०७.२०१७ रोजी वेतनापोटी द्यावयाचा निधी मुंबई विद्यापीठास वितरीत करण्यात आलेला आहे.

(२) मुंबई विद्यापीठातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन हे विद्यापीठाच्या विद्यापीठ निधीतून अदा करण्यात येत असल्याने, शासनाकडून निधी न मिळाल्याने मुंबई विद्यापीठाने विद्यापीठातील ४७० कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा सेवा समाप्त केलेल्या आहेत ही बाब खरी नाही.

(३) शासनाकडून विद्यापीठास मंजूर असलेल्या पदांच्या वेतनाचा निधी दि. २४.०७.२०१७ रोजी विद्यापीठास वितरीत करण्यात आलेला आहे.

(४) विद्यापीठाने त्यांच्या आवश्यकतेनुसार कंत्राटी पदे भरलेली आहेत. सदर पदांच्या वेतनाचा व अनुषंगीक खर्च विद्यापीठ निधितून करण्यात येतो. त्यामुळे अशा कंत्राटी सेवकांच्या सेवा कायम करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासन सेवेत थेट नियुक्ती देण्याबाबत**

**(४८) ९३९१५ (२१-०८-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासन सेवेत थेट नियुक्ती द्यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री क्रीडा व युवक कल्याण यांचेकडे दिनांक २६ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात निर्णय घेण्यासाठी मा.मुख्य सचिव यांनी दिनांक २६ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास बैठक घेतली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासन सेवेत थेट नियुक्ती देण्याचा निर्णय घेतला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने खेळाडूंना नोकरी देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१०-११-२०१७) :** (१), (२) व (३) होय.

(४) राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या अत्युच्च गुणवत्ताधरक खेळाडूंची दि.२७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये विविध विभागातील पदांवर निवड करण्यात आली असून संबंधित प्रशासकीय विभागाकडून त्यांना नेमणूक देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शिवछत्रपती पुरस्काराचे वितरण गत ३ वर्षापासून शासनाकडून झाले नसल्याबाबत**

**(४९) ९४१६० (२१-०८-२०१७). श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) क्रीडा क्षेत्रातील शिवछत्रपती पुरस्कार हा अतिशय मानाचा पुरस्कार मानला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाकडून गत ३ वर्षापासून शिवछत्रपती पुरस्काराचे वितरण झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिवछत्रपती पुरस्काराचे वितरण झाले नसल्याने खेळाडूंमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पुरस्कार न देण्याची नेमकी काय कारणे आहेत, तसेच उक्त पुरस्कार वितरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२४-१०-२०१७) :** (१) व (२) होय.

(३), (४) व (५) शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराच्या नियमावलीत सुधारणा करण्यात आली असून, दिनांक १६ ऑक्टोबर, २०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. तीन वर्षासाठी एकत्रित पुरस्कार वितरित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

---

**बडनेरा (जि.अमरावती) येथील तंत्रनिकेतन महाविद्यालयात शिकणाऱ्या अल्पसंख्यांक विध्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्याबाबत**

**(५०) ९४५०८ (२१-०८-२०१७). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बडनेरा (जि.अमरावती)येथील तंत्रनिकेतन महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे सन २०१६-१७ या वर्षासाठीचे शिष्यवृत्तीचे अर्ज तांत्रिक अडचणीमुळे भरले गेले नसल्याने ४० अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात संबंधित कॉलेजचे प्राचार्य, विभाग प्रमुख यांनी सहसंचालक तंत्रशिक्षण विभाग कार्यालय शासकीय तंत्रनिकेतन परिसर गाडगेनगर अमरावती याना पत्र पाठवून ४० विद्यार्थाना न्याय मिळण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अल्पसंख्याक विध्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधित विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-११-२०१७) :** (१) होय.

(२) होय.

(३) श्री.रवि राणा विसस (बडनेरा, जिल्हा अमरावती) यांनी दिनांक २८/०६/२०१७ रोजी सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय अमरावती यांना पत्र देऊन त्याची प्रत मा.मंत्री उच्च व तंत्र शिक्षण यांना पृष्ठांकित केली आहे.

(४) दिनांक ३०/११/२०१६ या अंतिम दिनांकापर्यंत, सन २०१६-१७ साठी, सदर योजनेसाठी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याबाबत जाहिरातीव्दारे कळविण्यात आलेले होते आणि वेळापत्रकानुसार अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांना पुरेसा ४ महिने वेळ देण्यात आलेला होता. अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांना संस्थेचे शैक्षणिक शुल्क भरण्यामध्ये अडचण येवू नये यासाठी गुणवत्ता यादीनुसार विद्यार्थ्यांना लवकरात लवकर शिष्यवृत्तीची रक्कम बँक खात्यामध्ये देण्यासाठी एक ठराविक वेळापत्रकानुसार कार्यवाही करण्यात येते. जर वर्षात ४ महिने या कालावधीपेक्षा अधिक कालावधी विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी देण्यात आला तर भरलेल्या अर्जाच्या विद्यार्थ्यांची गुणवत्तेनुसार यादी बनवून शिष्यवृत्तीचे वाटप लवकरात लवकर करणे शक्य होणार नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**नागपूर.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.